# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of stolen property**

**Police Station** :- **Manora**

**Date of Good Work done** :- **19/10/2022**

**Brief of the work done :-**

भुईमुगाची चोरी करून ट्रकसह फरार झालेल्या आरोपीस मानोरा पोलिसांनी अटक केली आहे.

# १४ महिन्याआधी भूईमुगाचा ट्रक घेऊन जाणारा आरोपी अटक

देशोन्नती वृत्तसंकलन...

**मानोरा** ▪ मानोरा पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या शहरातील व्यापारी नरेश मुंगशीराम पाटील यांची ३४३ पोते भुईमुंग शेंग १८ ऑगस्ट ला ट्रॅक चालक रमेशभाई वालजीभाई बारोत यांनी भुईमुंग शेंगचा ट्रॅक जामवाडी येथे न पाठविता फिर्यादी यांची फसवणूक केली. मानोरा पोलीस स्टेशनला आरोपी विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करून पोलिसांनी प्रकरण तपासात घेतले होते. तपास पथकाने चक्रे फिरवत यातील आरोपी शेख वनराज नाजाभाई याला अटक करण्यात आले आहे.

पोलीस सूत्रांकडून प्राप्त माहिती नुसार मानोरा येथील गणराज ट्रेडिंग कंपनीचे मालक नरेश मुंगशीराम पाटील यांचे मार्फत पुसद येथील ट्रान्सपोर्ट मार्फत ट्रक बोलावून ट्रॅक क्र. जी.जे.१२ ए डब्लू १५६४ हा ट्रॅक मानोरा येथे पाठवून या मध्ये ३४३ पोते भुईमुंग शेंग १८ ऑगस्ट ला जामवाडी येथे पाठवायचे होते मात्र ट्रॅक जामवाडी येथे पोचला नसल्यामुळे पुसद येथील आशिष रमेश बजाज यांनी मानोरा पोलीस स्टेशनला फिर्याद दिल्याने आरोपी ट्रॅक चालक रमेश भाई वालजी भाई बारोत यांचे विरुद्ध कलम ४२०, ३४ भादवी गुन्हा दाखल करून प्रकरण तपासात घेऊन यांतील आरोपी शेख वनराज नाजाभाई चालक यांना गुजरात राज्यातील राजकोट जिल्ह्यातून अटक करण्यात आली.

ही कामगिरी ठाणेदार ब्रम्हदेव शेळके यांचे मार्गदर्शनात तपास पथकाचे जमादार मयुरेश तिवारी, बालाजी महल्ले पाटील, पंकज खाडे यांनी केली घटनेचा तपास एपीआय महेश कुचेकर करीत आहे. आरोपीला न्यायालयात हजर केले असता तीन दिवसाची पोलीस कोठडी देण्यात आली. (ता.प्र.)